आर.सी.सी क्र.१४१२/२०१८
सरकार विरुध्द. रमेश
निशाणी क्र.५६/क पुढे सुरु...

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी –**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. मोहम्मद इलियास मोहम्मद सईद शेख**

वय – ६१ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार – सुधाकर नगर, बीडबायपास, औरंगाबाद.

----------------------------------------------------

**पुढील सरतपासणी अभियोग पक्षा करीता श्रीमती. एम. एस. राऊत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वाराः–**

४. सहा. सरकारी वकील, आरोपींचे विधिज्ञ, आरोपी तसेच साक्षीदार यांच्यासमक्ष डि.व्ही.डी. सिलबंद पाकीटातुन काढण्यात आली. तसेच डि.व्ही.डि. संगणकावर चालु करण्यात आली. साक्षीदाराला आता संगणकावर डी.व्ही.डी. मधील फोटो दाखवण्यात आले. डी.व्ही.डी. मध्ये उपलब्ध चलचित्र हे अडीच कि.मी. पुर्ण झाल्यावर असलेल्या पॉइंन्टवर उमेदवारांना गुलाबी टोकण दिले त्यावेळीचे आहे. चलचित्र राज्य राखीव पोलीस दलातील कर्मचारी दिसत असुन भरती प्रक्रियेत सामिल झालेले उमेदवार हे त्या पॉइंन्टवर पोहोचल्यावर उमेदवारांना गुलाबी रंगाचे टोकण देतांना दिसत आहे. डी.व्ही.डी. मधील ४२ सेकंद चालु असतांना चेस्ट क्रमांक २८६३ हा उमेदवार दिसत असुन साक्षीदाराने हा आरोपी रमेश दांडगे असल्याचे सांगितले. तसेच या चलचित्रात चेस्ट क्रमांक २८६५ हा उमेदवार अडीच कि.मी. चा पॉइंन्ट ओलांडतांना दिसत नाही. सदरील चलचित्र हे अडीच कि.मी. अंतराचा पॉइंन्ट पहिला उमेदवार पास करतांना सुरु होते व शेवटचा उमेदवार जाईतोपर्यंतचा आहे. सदरील चलचित्र हे एकुण ६ मिनीटे २० सेकंदाचे आहे.

५. फोटो क्रमांक १ मध्ये चेस्ट क्रमांक २८६५ चा उमेदवार दिसत असुन हा आरोपी अमोल वाणी आहे असे साक्षीदार सांगतो. फोटो क्र.२, ३ व ४ मध्ये चेस्ट क्रमांक २८६५ हा सुध्दा आरोपी अमोल वाणीच आहे. फोटो क्रमांक ५, ६, ७, ८, ९,

१० व ११ मध्ये कोणीही उमेदवार ओळखता येत नाही. फोटो क्रमांक १२ व १३ मध्ये चेस्ट क्रमांक २८६३ हा दिसतो, परंतु साक्षीदाराला त्याला ओळखता आले नाही. फोटो क्रमांक १४ मध्ये चेस्ट क्रमांक २८६३ दिसतो व हा फोटो अडीच कि.मी. च्या पॉइंन्टवर असुन त्यात चेस्ट क्रमांक २८६३ आरोपी रमेश दांडगे आहे असे सांगतो. सदरील डी.व्ही.डी. चे भारतीय पुरावा कायदयांतर्गत प्रमाणपत्र हजर केले असुन ते नि.क्र.५९ वर आहे. सदरील डी.व्ही.डी. हिच आहे व त्यातील चलचित्र बरोबर आहे. सदरील डी.व्ही.डी. ला **नि.क्र.६१** देण्यात येत आहे.

६. सदर डी.व्ही.डी. मध्ये असलेले रेकॉडींग हे दिनांक १७.०३.२०१८ रोजी भरतीच्या दिवशीचे आहे, हेच माझ्यासमक्ष जप्त केले होते व याचा जप्ती पंचनामा माझ्यासमक्ष तयार केला होता. आज रोजी दोन्ही आरोपी न्यायालयात हजर आहेत, त्यांना मी ओळखतो.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एस. पी. सरताळे यांच्यामार्फत उलटतपास सुरु...**

७. हे म्हणणे खरे आहे की, भरतीचे प्रमुख सुरेश माटे हे होते. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रिया सदरील दिवशीचा पुर्ण झाल्याचा अहवाल वरिष्ठ सुरेश माटे यांना दिला होता. मी भरती प्रक्रियेच प्रमुख नव्हतो, फक्त कमिटी सदस्य व अल्पसंख्यांक अधिकारी म्हणुन नियुक्त होतो. रविंद्र पवार, अंकुश गोरे, दिनेश इटकर, राजेश चव्हाण, चरणसिंग चेरोडे हे देखील भरती प्रक्रियेत सामील होते. हे म्हणणे खरे आहे की, भरतीच्या दिवशी मी अथवा या सर्वांना भरतीत काही अनुचित प्रकार घडल्याचे निदर्शनास आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेत त्या दिवशी प्रत्यक्ष फिल्डवर नियुक्त असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी नेमलेले कर्तव्य पार पाडले होते.

८. हे म्हणणे खरे आहे की, आलेली निनावी तक्रार ज्यांनी कोणी दिली, ती माझ्याविरुध्द होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारीमध्ये मी पैसे घेवुन टोकण देत होतो असा माझ्यावर आरोप होता. सहा. पोलीस हे.कॉ.२८३ गणेश देविदास चित्ते राज्य राखीव पोलीस बल गट याने एक तक्रार माझ्याविरुध्द दिली होती. सदर तक्रार मी

चौकशी दरम्यान वाचली होती. सदर तक्रार बाबत सुरेश माटे यांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

९. हे म्हणणे खरे आहे की, ज्यादिवशी भरती झाली त्यादिवशीचे सी.सी.टी.व्ही. फुटेज मी स्वतः पाहिले नाही. सी.सी.टी.व्ही. फुटेज व फोटो करिता आमचे कर्मचारी नेमले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी माझ्याकडे कोणतीही तक्रार आलेली नव्हती.

**प्रश्न** – सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये एक उमेदवार पुन्हा दिसत नाही ?

**उत्तर** – साक्षीदार सांगतो की एक उमेदवार दिसतच नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, एकदा उमेदवार अडीच कि.मी. च्या पॉइंन्टवरुन पास झाल्यानंतर पुन्हा दिसत नाही. साक्षीदार सांगतो की, तो उमेदवार पुन्हा दिसतो. साक्षीदाराला पुन्हा डी.व्ही.डी. चालु करुन दाखवली. पुन्हा डी.व्ही.डी. पाहिली असता, ०२ मिनीटे ०१ सेकंदाला चेस्ट क्रमांक २८६३ हा उमेदवार दिसला, साक्षीदारा सांगतो की, हा आरोपी रमेश दांडगे दिसत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर फुटेज हे तक्रार प्राप्त झाल्यानंतर पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे नेमलेले कर्मचारी हे एक उमेदवार एकदाच तेथुन जातो की पुन्हा जातो हे सर्व व्यवस्थीत पाहुन काळजी घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, अडीच कि.मी. च्या पॉइंन्टवरुन जेवढे उमेदवार तेथुन पास झाले त्यांची नोंद लिखीत स्वरुपात तेथे घेतली जात होती. हे म्हणणे खरे आहे की, सी.सी.टी.व्ही. फुटेज हा तक्रार देण्यापुर्वी पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५७ मध्ये मी जे काही नमुद केले आहे तशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५७ तक्रार उशिरा का नमुद करण्यात आली त्याचे देखील कारण नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ याने शासनाची कोणतीही फसवणुक केलेली नाही.

**आरोपी क्र.१ करिता उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

**(मध्यांन्हाची वेळ झाल्याने पुढील उलटतपास तहकुब.)**

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| --- | --- |
| RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.04.15 17:25:32 +0530 | RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.04.15 17:25:36 +0530 |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक– १५/०४/२०२६.

**आरोपी क्र.२ तर्फे विधिज्ञ श्री. व्ही. एस. वाकळे यांच्यामार्फत उलटतपास सुरु...**

११. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे भरतीमध्ये चेस्ट क्रमांक कोणी दयावा, टोकण कोणी दयावे, व्हीडीओग्राफी अथवा कागदपत्रांत माहिती कोणी भरायची याविषयी नावानीशी आदेश काढला जातो. हे म्हणणे खरे आहे की, यापैकी माझ्याकडे कोणीतीही जबाबदारी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, भरतीप्रक्रियेत वापरण्यात आलेले चेस्ट क्रमांकाचे लेबल म्हणजे कपडा, टोकण व त्याची व्हीडीओग्राफी माझ्या ताब्यात नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, भरतीप्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर या सर्व वस्तु वरिष्ठांकडे अहवालासोबत जमा करण्यात येत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त झाल्यास ते पाहण्याचा अधिकार वरिष्ठ भरती प्रमुखांना आहेत. हे म्हणणे खरे आहे की, चेस्ट क्रमांक, टोकण, व्हीडीओग्राफी याविषयी काही तक्रार प्राप्त झाल्यास तर ते पुन्हा पाहिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, या वस्तुंच्या बाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या वस्तुंचा पुन्हा पाहण्यासाठी पंचनामा झाला किंवा नाही याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्हिडीओग्राफी अथवा सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहण्याचा मला अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेत काही उमेदवारांना मी मदत केली म्हणुन माझ्याविरुध्द तक्रार झाली होती. सदर तक्रारीमध्ये आरोपी क्र.१ व २ यांचे नाव त्यांच्या चेस्ट क्रमांकासहित मदत केल्याबाबत नमुद नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयाने मी या भरती प्रक्रियेत कोणाला मदत केली अथवा नाही याबाबत चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार झाला नाही, साक्षीदार पुन्हा सांगतो की, माझ्या चौकशीत मी काही गैरप्रकार केला नाही असे निष्पन्न झाले नाही. आरोपींनी भरती प्रक्रियेत काही गैरप्रकार केला असा अहवाल माझ्या वरिष्ठांनी मला दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, भरती

प्रक्रियेत काही गैरप्रकार आढळल्यास किंवा त्यात काही तथ्य आढळेल तर तसा अहवाल पोलीस स्टेशनला पाठवला जातो. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेत काही गैरप्रकार आढळल्यास तसा अहवाल वरिष्ठ अधिका–यांनी दिल्याशिवाय तक्रार दाखल करता येत नाही. मला वरिष्ठ अधिका–यांनी आरोपींनी गैरप्रकार केला आहे याबाबतचा आवक जावक क्रमांकाव्दारे कोणताही अहवाल दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेत एखादया अधिका–यावर गैरप्रकाराबाबत संशय असेल अथवा तक्रार प्राप्त झाली असेल तर त्या अधिका–याला किंवा कर्मचा–याला आमच्या कार्यालयातील चौकशी दरम्यान विभक्त ठेवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, या कर्मचा–याला विभक्त ठेवले जाते कारण गुन्हा नोंदवणे व भरती निष्पक्षपणे व्हावी यासाठी विभक्त ठेवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या अधिकारी किंवा कर्मचारी याच्यावर गैरप्रकाराबाबत आरोप आहे त्याला गुन्हा दाखल व गुन्हयाची चौकशी दरम्यान विभक्त ठेवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेत गैरप्रकार आढळुन आल्यास वरिष्ठ अहवाल तयार करुन एखादया अधिका–याला गुन्हा दाखल करण्यासाठी नामनिर्देशित करतात. माझ्या नावाने गुन्हा दाखल करा असा आदेश काढला होता. मी असा आदेश त्याचा क्रमांक, त्या आदेशाची प्रत फिर्याद दाखल करतांना किंवा तपासाच्या दरम्यान पोलीसांना दिला नाही किंवा तो खटल्यात दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर आदेश आज रोजी न्यायालयता देखील आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींवर गुन्हे दाखल करा असा आदेश आमच्या कार्यालयाने दिलेला नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, व्हीडीओग्राफी चे काम आमच्याकडे बाहेरील कंत्राटी माणसांकडुन केले जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर भरती प्रक्रियेची पुर्ण चित्रफित मी पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर भरती प्रक्रियेत किती उमेदवारांचा सहभाग होता, किती उमेदवारांची मैदानी चाचणी झाली याबाबत मला काही सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व उमेदवारांचे गट तयार करुन त्यांची मैदानी चाचणी व ईतर चाचण्या वेगवेगळया करण्यात आल्या, साक्षीदार सांगतो की, फक्त पाच कि.मी. पळण्यासाठी एकत्रित चाचणी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ हा आरोपी क्र.१ च्या गटातच नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सर्व उमेदवारांचा गटबाबत तक्ता माझ्या वरिष्ठांनी तयार केला होता. सदर तक्ता गुन्हा दाखल करतांना अथवा

तपासादरम्यान पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज न्यायालयात पाहिलेली चित्रफित हि कोणत्या कॅमे-याची आहे ते मला सांगता येत नाही. मला हे सांगता येणार नाही की, भरती प्रक्रियेत किती कॅमेरे बसवले होते व त्याचे क्रमांक काय दिले होते ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर चित्रफितमध्ये तेथे दिसणारा बिंदु हा कोणता आहे असे दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ कडुन आरोपी क्र.२ ला टोकण प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जेवढे उमेदवार मैदानी चाचणीसाठी अथवा पाच कि.मी. पळण्यासाठी सहभागी होतात तेवढेच टोकण हे मध्ये बिंदुजवळ अधिका-यांना त्या उमेदवारांना देण्यासाठी दिले जातात. एखादया उमेदवाराला टोकणच मिळाले नाही व त्याने आमच्याकडे तक्रार केली असे काही झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे जेवढे टोकण होते तेवढे आम्ही वाटले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे एका उमेदवाराला दोन टोकण मिळण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर चित्रण हे कोणत्या डिव्हाईसमध्ये जमा करण्यात आले त्याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वरिष्ठांनी मला माहिती सांगितली त्या माहितीच्या आधारे मी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांनी दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवला व मी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, भरती प्रक्रियेच्या कमिटीसमोर कोणतीही चौकशी झाली नाही अथवा त्याचा अहवाल तयार केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला संगणक चालवणे अथवा त्याबाबत मला काही ज्ञान नाही. भरतीचे जे चित्रीकरण ज्या डिव्हाईसमध्ये जमा केले ते मुळ डिव्हाईस पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात जमा केलेली डी.व्ही.डी. यामधील जे काही चित्रीकरण आहे ते मी जमा करुन घेतलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कार्यालयातील कर्मचारी यांनी मला डी.व्ही.डी. दिली व मी ती पोलीसांना दिली. मला टंकलेखन करता येत नाही. नि.क्र.५९ प्रमाणपत्र कार्यालयातील कर्मचा-याने टंकलिखीत करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५९ प्रमाणपत्रातील मजकुर मी वाचला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५९ खोटे प्रमाणपत्र सादर केले.

१३. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६१ चित्रफितमधील चार ते पाच उमेदवारांचे चेस्ट क्रमांक व चेहरे अस्पष्ट दिसतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२

ने भरती प्रक्रिया कोणताही गैरप्रकार न करता पार पाडली तरी सुध्दा मी त्याचे नाव गुन्हयात समाविष्ट केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावरील आरोप झटकरण्याकरिता मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, भरती प्रक्रियेत वापरण्यात येणारे टोकण, चेस्ट क्रमांकाचे कापड हे सर्व पोलीसांना देण्याचे अधिकार वरिष्ठांना आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.04.15 17:25:42 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक– १५/०४/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.04.15 17:25:46 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद